स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या 'मानव्य' विद्या शाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा स्थूल आराखडा

# विषय : मराठवाडी मराठी बोलीचा चिकत्सक अभ्यास

संशोधक

भरतकुमार लक्ष्मीनारायण जसाभाटी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुभाष कदम

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

२०१७

# मराठवाडी मराठी बोलीचा चिकित्सक अभ्यास

## प्रास्ताविक

भाषा ही माणसांचे संपूर्ण जीवन व्यापून टाकणारी संस्था आहे. भाषा अभ्यासाचे क्षेत्रही खूप व्यापक आहे. भाषा ही नित्यपरिवर्तनीय असल्यामुळे भाषेत सतत बदल होत असतो. त्यामुळे ती खूप गुंतागुंतीची आहे. भाषेच्या अभ्यासाला खूप मोठी परंपरा आहे. असे आपणाला दिसून येते. सुरुवातीला ऐतिहासिक, तौलनिक भाषाविज्ञानाच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली. परंतु आधुनिक काळात भाषांचा अभ्यास करताना तो वैज्ञानिक पातळीवर झालेला आहे. त्यामुळे वर्णनात्मक भाषाविज्ञान ही पध्दती सर्व भाषाभ्यास पध्दतींच्या केंद्रस्थानी आली असे दिसून येते.

## अभ्यास विषयाची निवड

सध्या भाषाविज्ञानाच्या क्षेत्रात विविध प्रकारचे संशोधन सुरु आहे. मराठवाडा विभाग भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्रात आहे. पण मराठवाडी बोलीचे एक वेगळेपण असल्याचे आपणास दिसून येते. राजकीय संक्रमण, सांस्कृतिक देवाण घेवाण तसेच कामानिमित्त, नौकरीनिमित्त भिन्न भाषिक लोक राहत असल्याने मूळ मराठीपेक्षा या प्रदेशाच्या बोलीचे वेगळेपण आपणास दिसून येते. ह्या वेगळेपणाचा शोध घेऊन या बोलीची वेगळी ओळख तपासणे व ती सर्वांपुढे मांडणे या हेतूने हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

## विषयाचे महत्व

मराठी भाषेचा तसेच मराठीच्या विविध बोलींचा अभ्यास झाल्याचे आपणाला दिसून येते. मराठवाड्याचे राजकीय योगदान, सामाजिक योगदान, व्यापारी केंद्रे, उद्योग व्यवसाय, सांस्कृतिक

वारसा या सर्वांची ओळख सर्वांना आहे. पण या मराठवाड्याची एक स्वतंत्र अशी बोली वरील सर्व कारणामुळे आकाराला आलेली असल्याचे आपणाला दिसून येते. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये बोलीचे स्वरुप तपासून पाहणे आणि तिचे वर्णनात्मक स्वरुप मांडणे आगत्याचे आहे. मराठीच्या विविध बोली आणि मराठवाडी बोलीतीत साम्य-भेद अभ्यासणे हे अभ्यासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे.

## विषयाची व्याप्ती

मराठीवाडी बोलीचा अभ्यास करताना तो मूळ मराठी बोलीपेक्षा मराठवाड्यातील बोलीतील स्वनिमव्यवस्था, रुपव्यवस्था, वाक्यव्यवस्था व अर्थव्यवस्था यामध्यें कशा प्रकारे बदल दिसून येतो हे अभ्यासणे. तसेच हा बदल होत असताना त्यावर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, दळण-वळण त्याचबरोबर भिन्नभाषिक संक्रमण यांचा प्रभाव कसा पडला व त्याचा परिणाम काय दिसून येतो ते तपासणे. त्यासाठी मराठवाड्यातील व्यापारी, कामगार, रेल्वेस्टेशन, विविध बसस्थानके, लहानमोठी शहरे, गावे, लिंग, वय, सामाजिक स्तर, सांस्कृतिक प्रसंगातील भाषेचे नमुने गोळा करणे, त्याव्दारे अभ्यासाची प्राथमिक साधने उपलब्ध करणे आणि मराठवाडी बोलीतून झालेली साहित्यनिर्मितीचे पुरावे शोधणे व स्वरुप निश्चित करणे असे या अभ्यासाचे धोरण आहे.

## अभ्यासाची उद्दिष्टे

* मराठवाडी मराठी बोलीची ध्वनिव्यवस्था अभ्यासणे.
* मराठवाडी मराठी बोलीची रुपव्यवस्था अभ्यासणे.
* मराठवाडी मराठी बोलीच्या वाक्यव्यवस्थेचा अभ्यास करणे.

* मराठीवाडी बोलीवरील राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक व भिन्नभाषिक लोकांमुळे होणारा परिणाम याचा शोध घेणे व त्यातून निर्माण झालेल्या नव्या भाषिक व सांस्कृतिक रुपांचा शोध घेणे.

**अभ्याससाची पध्दती**

मराठवाडी बोलीचा अभ्यास करताना सूक्ष्म भाषविज्ञानाचा अवलंब करण्यात येईल. सूक्ष्म भाषाविज्ञान म्हणजे भाषेच्या अंतर्गत संरचनांचा अभ्यास. हा अभ्यास जसा वर्णनात्मक अभ्यास पध्दतीच्या आधारे करण्यात येईल तसाच तो समाज भाषावैज्ञानिक पध्दतींनेही करता येईल. एकूण बोलीचे भाषिक रुप तपासणे आणि तिचे सांस्कृतिक – सामाजिक संदर्भ शोधणे असे या अभ्यासाचे स्वरुप राहील. तसेच या अभ्यासासाठी सर्वेक्षण पध्दतीचाही अवलंब करण्यात येईल.

* **संकल्पित प्रबंधाची प्रकरण विभागणी**

**प्रकरण पहिले : भाषा आणि बोली – संकल्पना व स्वरुप**
**प्रकरण दुसरे : मराठवाडी बोलीची स्वनिमव्यवस्था व रुपिमव्यवस्था**
**प्रकरण तिसरे : मराठवाडी बोलीची वाक्यव्यवस्था**
**प्रकरण चौथे : मराठवाडी बोलीची अर्थव्यवस्था**
**प्रकरण पाचवे : मराठवाडी बोलीतील साहित्य व तिचे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ**
**प्रकरण सहावे : उपसंहार**

**प्रकरण पहिले : भाषा आणि बोली – संकल्पना व स्वरुप**

मराठवाडी बोलीचा अभ्यास करत असताना आपणास सुरुवातीला भाषा आणि बोली हे घटक समाजवून घेणे गरजेचे आहे. भाषा आणि बोली ह्या संज्ञा काही ठिकाणी स्वतंत्र आहेत तर काही ठिकाणी त्यांच्यात आपणाला साम्यभेद दिसून येतो. त्यांचे ते अस्तित्व स्पष्ट करणे. तसेच ते

एकमेकांस कसे पूरक आहेत हे मांडणे भाषा व बोली यांच्यामधील सहसंबंध लक्षात घेतल्यावर त्याविषयीचे अनेक गैरसमज दूर होण्यास मदत होते.

भाषा व बोली या संज्ञा समजावून घेतल्यानंतर आणि त्यांच्यातील परस्परसंबंध व साम्यभेद आधोरेखित केल्यानंतर मराठवाडी बोलीचे स्वरुप समजावून घेणे सोपे जाईल.

**प्रकरण दुसरे : मराठवाडी बोलीची स्वनिमव्यवस्था व रुपिमव्यवस्था**

बोलीचे वर्गीकरण स्वनिमव्यवस्थेत करत असताना स्वनिमांची संख्या निश्चित करणे व वर्गीकरण करणे व ते स्वर व व्यंजन या गटात मांडले जातील. मराठवाडी बोलीचे हे वर्णन स्वरव्यवस्था, व्यंजनव्यवस्था, खंडाधिष्ठित अभिलक्षणे, संयोगव्यवस्था आणि अक्षरव्यवस्था यात मांडून त्यांचा सविस्तर अभ्यास करणे. यासाठी मराठवाडी बोलीचे लिंग, वय, सामाजिकस्तर, विविध भागातील बोलीचे नमुने गोळा करणे व अभ्यास करणे तसेच या मराठवाडी बोलीची लय आणि लकब मराठी शब्द बोलतानाचा संबंध यांचा शोध घेणे.

उदा. काय लका, लय भारी, हेल काढून म्हणजे सूर वाढवून बोलण्याची पध्दती. च, छ, ज, झ या दंततालव्य उच्चार या बोलीचे नमुने गोळा करुन अभ्यास करणे.

मराठवाडी बोलीची रुपिमव्यवस्थेचा अभ्यास करताना लिंग, वय, सामाजिकस्तर, सांसकृतिक संक्रमण, राजकिय संक्रमण, उच्चारसौकर्य, दळण-वळण, उद्योग व्यापार यामुळे त्यात कसा बदल होत आहे तसेच सिमावर्ती भागातील जिल्ह्यात, कन्नड, तमीळ, तेलगू या भाषिक लोकांच्या बोलीतील पद मराठवाडी बोलीत समाविष्ट झालेली आहेत का? याचा मराठवाड्यातील विविध जिल्ह्यातील, गावातील बोलीचे नमुने गोळा करुन तपासणे.

उदा. ओ पावणं, काऊन बे, लई चांगलं, असे भाषिक वापराचे रुप यातून मराठवाडी बोलीची ओळख पटते.

**प्रकरण तिसरे : मराठवाडी बोलीची वाक्यव्यवस्था**

पदापासून वाक्यापर्यंतचा विचार हा वाक्यव्यवस्थेत असतो. मराठवाडी बोलीतील वाक्यव्यवस्था ही प्रमाण मराठीतील वाक्यव्यवस्थेपेक्षा कशा स्वरुपात वेगळी आहे याचा शोध घेणे आपला विचार समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहचविण्यासाठी माणूस शब्दांची जुळणी करुन वाक्य तयार करत असतो. ते व्याकरणिकदृष्ट्या कसे आहे याचा विचार तो करत नाही. वेगवेगळ्या जाती धर्माचे व भिन्न भाषिक एकत्र असणारे मराठवाड्यातील लोक दैनंदिन व्यवहारासाठी बोलताना वाक्याची कशी जुळणी करतात याचा अभ्यास करणे या मध्ये अभिप्रेत आहे.

उदा. ते तसंच टाकून दिलं sss बग.....

काऊन आले नाई ओ... (क्रियापदाचा नेमका वापर नसण) या सर्वांचा अभ्यास करणे.

**प्रकरण चौथे : मराठवाडी बोलीची अर्थव्यवस्था**

भाषिक संदेश हा अर्थाव्दारेच पूर्ण होत असतो. त्यामुळे अर्थ विचाराला महत्व प्राप्त झाले आहे. अर्थविचारावर फार संशोधन झालेले आहे पण 'अर्थ म्हणजे नेमके काय' ? हे कोणलाही सांगता आलेले नाही. असे असले तरी बोलीचा अभ्यास करताना अर्थविचाराकडे दुर्लक्ष करुन चालत नाही.

भिन्न भाषिक समाज जवळ आल्यावर त्यांचे विचार व संस्कृती यांची देवाण-घेवाण होत असते. त्यात बरेचसे शब्दही भाषेत संक्रमित होत असतात. त्यावेळी त्या शब्दांच्या अर्थातही बदल

होत असतो. नांदेड सारख्या जिल्ह्यात पंजाबी बोलीतील बरेचसे शब्द मराठीत आल्याचे आपणास दिसून येतात. त्यांच्या अर्थात काय बदल झाला आहे का? ते तपासणे तसेच प्रमाण मराठी व मराठवाडी बोली यांच्यातील अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे.

**प्रकरणे पाचवे : मराठवाडी बोलीचे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ**

मराठवाड्यात उद्योग, व्यापार, दळण-वळण या निमित्ताने कन्नड, तमीळ, तेलगू, पंजाबी, गुजराती असे भिन्न भाषिक, भिन्न संस्कृतीचे लोक एकत्र आल्याने त्यांच्या दैनंदिन सामाजिक जीवनाची व संस्कृतीची देवाण घेवाण होत असते. मराठवाड्यातील विविध शहरामधील, गावामधील बोलीत असे भिन्न भाषिक संस्कृतीचे नमुने यांचा शोध घेणे तसेच मराठवाडी बोलीचे म्हणून सामाजिक व सांस्कृतिक वेगळेपण येथील लेखकांच्या लेखनात आलेले आहेत का? ते तपासणे. मराठवासड्यातील विविध ठिकाणच्या यात्रा, ऊरुस, उत्सव, यानिमित्ताने तेथील सांस्कृतिक वारसा व मराठवाडी बोली यांचा संबंध तपासणे तसेच मराठवाडी बोलीचे सामाजिक संदर्भ शोधणे व अभ्यासणे.

**प्रकरण सहावे : उपसंहार**

मराठवाडी बोली व तिचे वेगळेपण व स्वतंत्र अस्तित्व यांचा शोध घेत असताना तो 'मराठवाडी मराठी बोलीचा अभ्यास' या अनुषंगाने करावयाचा आहे.

वरील पाचही प्रकरणांच्या शेवटी अभ्यासांती हाती आलेले निष्कर्ष उपसंहार या प्रकरणात मांडण्यात येतील. प्रबंधाच्या शेवटी निवडक ग्रंथ सूची जोडण्यात येईल.

## :: संदर्भग्रंथ ::


| | | |
|---|---|---|
| १) | भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक | संपा.मालशे स.ग., सोमण अंजली इनामदार हेमंत |
| २) | आधुनिक भाषाविज्ञान : सिध्दांत आणि उपयोजन | मालशे मिलींद |
| ३) | सुलभ भाषाविज्ञान | पुंडे द.दि. |
| ४) | वैखरी | केळकर अशोक |
| ५) | भाषाविज्ञान आणि मराठी भाषा | ग्रामोपाध्ये गं.ब. |
| ६) | मराठीचा भाषिक अभ्यास | कानडे मु.श्री. |
| ७) | मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान | कदम महेंद्र |
| ८) | मराठी भाषा : उद्‌गम आणि विकास | कुलकर्णी कृ.पां. |
| ९) | भाषा व संस्कृती | कालेलकर ना.गो. |
| १०) | बोली व भूगोल | कालेलकर ना.गो. |
| ११) | मराठी भाषेचे मूळ | खैरे विश्वनाथ |
| १२) | अर्वाचिन मराठी | धोंगडे रमेश |
| १३) | समाजभाषा विज्ञान | वरखेडे रमेश |
| १४) | सामाजिक भाषाविज्ञान : कक्षा आणि विस्तार | संपा.पाटणकर जयश्री |
| १५) | सामाजिक भाषाविज्ञान | संपा.जोशी प्रभाकर, गोखले चारुता |
| १६) | भाषाकारण | बिनीवाले अविनाश |
| १७) | प्रशासनिक मराठी | भागवत यशोदा |
| १८) | भयंकर सुंदर मराठी भाषा | पुंडे द.दि. |
| १९) | भाषा आणि जीवन (त्रैमासिक नियतकालिक, पुणे) | संपा.परांजपे प्र.ना. |


**संशोधक विद्यार्थी** **मार्गदर्शक**